अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । बुधवार, दि. २४ डिसेंबर २०२५ । ▶ वर्ष : २४ वे ▶ अंक : ८६ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने १२


## मुंबईत महाविकास आघाडी म्हणून लढण्याची गरज : सुप्रिया सुळे

✔ **मुंबई** : मुंबईत उद्धव ठाकरे यांच्या पक्षासोबत आमची चर्चा सुरू आहे. तरीही दोन्ही ठाकरे बंधू आणि काँग्रेससह महाविकास आघाडी म्हणून लढले पाहिजे. मतांचे विभाजन होऊ नये म्हणून सर्वांनी प्रयत्न करायला हवेत, अशी भूमिका राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांनी मांडली.

पुण्यात अजित पवारांकडील काही पदाधिकारी आणि आमच्याकडील काही पदाधिकाऱ्यांची चर्चा सुरू आहे. मात्र पुण्यात स्थानिक नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना विश्वासात घेतल्याशिवाय पक्ष कोणताही निर्णय घेणार नाही. तसेच पुणे, पिंपरी- चिंचवड महापालिकेत अजित पवार यांच्याशी युती करण्याबाबत कोणताही अधिकृत प्रस्ताव आलेला नसल्याचे सुप्रिया सुळे म्हणाल्या. आमचा पक्ष हा लोकशाही पद्धतीने चालतो. त्यामुळे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांना विश्वासात घेतल्याशिवाय कोणताही निर्णय घेणार नाही. पुण्यातील पक्षाचे नेते प्रशांत जगताप यांच्याशी सोमवारी माझी दोन तास चर्चा झाली. पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची चर्चा असल्याने जगताप नाराज आहेत किंवा कसे याविषयी आपल्याला माहिती नाही, असेही सुळे यांनी स्पष्ट केले.

## पालकमंत्र्यांचं हेलिकॉप्टर उडालं अन् सांगोल्यात आली 'त्सुनामी'!

# बापू अकेला था... पर काफी था!



सोलापूर/खास प्रतिनिधी

**सांगोल्यातील 'फार्म हाऊस'मधून पालकमंत्र्यांचं हेलिकॉप्टर उडालं आणि सांगोल्यात 'त्सुनामी'चा जन्म झाला. रुग्णांवर 'इलाज' करणाऱ्या डॉक्टरांचा 'नाईलाज' झाला! दीपकआबांना भाजपाचा हात मिळेल वाटत असतानाच त्यांच्या पायावर धोंडा पडला! स्वाभीमानाच्या वावटळीत बापू 'बापमाणूस' ठरला! बापू अकेला था! पर सांगोल्यासाठी काफी था!**

### बोराटवाडीच्या बंगल्यात सारंच काही शिजलं!

बाळासाहेब एरंडे आणि मारुती बनकर ही शेकापमधली मूळची जोडगोळी. ठेकेदारीच्या व्यवसायाला अडचण येऊ नये, म्हणून एरंडेंनी आमदार गोपिचंद पडळकर यांच्यामार्फत पालकमंत्री गोरेंपर्यंत पोचून भाजपचं 'कमळ' हाती घेतलंलं. याच एरंडेनी पुढं मारुती बनकर यांना भाजपच्या गळाला लावण्याचं ठरवलेलं. बनकर आणि गोरे हे दोघेही माळी समाजाचे. ठेकेदार एरंडे यांनी दोघांनी गाठभेट घालून दिलेली. त्यावेळी बनकर आणि गोरे यांच्यामधील समाजभावनेचं रक्त जागं झालेलं. त्यातून बोराटवाडीच्या बंगल्यात गोरेंनी बनकरांना भाजपात घेऊन नगराध्यक्षपदाच्या उमदेवारीचं कांड ठरवलेलं. पुढं गोरे हेलिकॉप्टर घेऊन एरंडेच्या फार्महाऊसवर आले अन् बनकरांच्या गळ्यात भाजपचं उपरणं घालून त्यांना नगराध्यक्षपदाचा अर्ज भाजपाकडून भरण्यास भाग पाडलेलं अन् गोरेंनी हुश्श म्हणून सुटकेचा नि:श्वास सोडलेला.

### 'इलाज' करणाऱ्या डॉक्टरांचा नाईलाज

वास्तविक डॉ.बाबासाहेब देशमुख यांचं रक्तसुद्धा जणू काही शेकापंच. त्यामुळं नगरपरिषदेच्या निवडणुकीत शेकापसोबत गद्दारी करुन भाजपचं काम करण्याचं पाप त्यांच्या हातून घडणार हे सांगोलकारांना स्वप्नातदेखील वाटलं नव्हतं. मात्र बाबासाहेबांना आमदार करताना म्हणे भाजपने मदतीचा हात दिलेला. त्याची आठवण भाजपवाल्यांनी करुन देत त्यांच्यावर नगरपरिषदेत भाजपचं काम करण्याचा दबाव आणलेला. रुग्णांच्या अनेक आजारांवर 'इलाज' करणाऱ्या डॉक्टर बाबासाहेबांचा इथं 'नाईलाज' झाला. भाजपमधील म्होरक्याच्या दबावतंत्रापुढं डॉक्टराचं शेकापचं इंजेक्शन कुचकामी ठरलं. आमदारकीवेळच्या मदतीचं मीठ खाल्लेले बाबासाहेब खाल्या मिठाला जागले. तिथंचं शेकापशी गद्दारी त्यांच्याकडून झाल्याची जनमानसात चर्चा सुरु झालेली.

### दीपकआबांच्या पायावर धोंडा

खरं तर माजी आमदार दीपक साळुंखे यांच्यासाठी त्यांचा भाजपमध्ये प्रवेश होणं हे अत्यंत महत्त्वाचं. सांगोल्याची नगरपरिषद त्यांच्या ठायी दुय्यम. कारण या पक्षात प्रवेश केला तरच राजकारणात आपलं नाणं चलती राहणार हे बुजुर्ग साळुंखेनी पुरतं ओळखलेलं. मात्र काही कारणांमुळे भाजपमध्ये होणारा त्यांचा प्रवेश लटकलेला. या टप्प्यावर सांगोला नगरपरिषदेच्या निवडणुकीत 'कमळ' फुलवण्याचा इतिहास घडवल्यास या पक्षामधील एंट्रीसाठी पूरक वातावरण होईल, म्हणून साळुंखेंनी शेकापसोबत युती न करता डॉ.बाबासाहेबांना घेऊन भाजप फॉर पॅनेल केलेले. मात्र भाजपला सांगोलकांरानी झिडकारताना साळुंखेंचं नुकसान झालं. अवघी एक जागा त्यांच्या गटाची आली. भाजप प्रवेशाचा विषय बाजूलाच राहिला. पण सांगोल्यातील वजनदेखील गेले. भाजपच्या नादात साळुंखेंच्या पायावर दगड पडला.

### पाटलांना एकटं पाडलं नव्हे नव्हे, चलाख बापूंनी सर्वांना हाबडा दाखवला!

नगरपरिषदेची निवडणूक एकत्र लढण्यासाठी सुरुवातीला आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख माजी आमदार दीपक साळुंखे हे आग्रही होते. या पार्श्वभूमीवर, सांगोल्यासह मुंबईत माजी आमदार शहाजी पाटील यांच्यासमवेत त्यांच्या बैठकादेखील झाल्या होत्या. पण स्वतंत्र निवडणूक लढायची हे पाटलांच्या मनात घोळत होतं. त्यातच भाजपवाल्यांनी बाळासाहेब एंरडेंच्या मध्यस्तीनं मारुती बनकरांच्याबाबीत जे घडवून आणलं ते पाटील यांच्या पथ्यावर पडलं. सांगोल्यातून 'आपला माणूस' म्हणून शहाजी पाटील यांच्यासंदर्भात सहानभुतीची लाट निर्माण झाली. त्यावर पाटील विजयाच्या दिशेने स्वार झाले.

'काय झाडी...काय डोंगार...काय हाटील...' या डॉयलॉगमुळं चांद्यापासून ते बांद्यापर्यंत चर्चेत राहिलेलं माजी आमदार शहाजी पाटील यांचं नाव 'सांगोला' नगरपरिषद निवडणुकीमध्ये घडलेल्या 'कमाल की बात' नं पुन्हा चर्चेच्या वादळात आलं. उमेदवारी भरण्याच्या धामधुमीच्या शेवटच्या दिवशी इथं मिरज रस्त्यावर ठेकेदार बाळासाहेब एरंडेच्या फार्महाऊसवर पालकमंत्री जयकुमार गोरेंच्या हेलिकॉप्टरचा धुराळा उडलेला. शेकापकडून नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज भरण्याचं ठरलेल्या मारुती बनकरांच्या गळ्यात भाजपचं उपरण घालत त्यांना या पक्षात 'हनुमान' उडी घ्यायला लाऊन पालकमंत्री गोरेंचं हेलिकॉप्टर अक्कलकोटच्या दिशेनं उडालेलं. हवेत उडताना गोरेंच्या हेलिकॉप्टरचा जसा धुरळा उडाला तसं समद्या सांगोल्यात वेगळं घडवण्याचा धुराळा उडालेला. बनकरांनी ऐन वेळी घात केला, शेकापशी गद्दारी करुन 'कमळ' हुंगल्याची वार्ता वाऱ्यासारखी पसरली तसं सांगोल्यात वातावरण बदलायला सुरुवात झाली. आमच्या सांगोल्याचं भलं बुरं...चांगलं वाईट हे सगळं बघायला आम्ही खंबीर अन् समर्थ असताना बाहेरच्या माणसांनं एवढं उरावर बसून निर्णय का घ्यावा...? आपल्या माणसाच्या कार्यालयावर छापेबाजी का करावी? असा सवाल विचारला जाऊ लागला. बाहेरच्या माणसाबद्दल संतापाची लाट उसळत त्यातूनच 'आपला माणूस'च्या 'त्सुनामी' जन्म झाला. निवडणुकीला स्थानिक आणि बाहेरचा अशी सहानभुतीची झालर लागलेली. त्यातच निवडणुकीत थ्रिलर घडला. एखाद्या माणसानं इथलं साम्राज्य मिळवण्यासाठी 'राजरंग' करावा. मात्र हिम्मतबाज अन् स्वाभिमानी गाववाल्यांनी त्याचा हा डाव उधळून टाकावा असं एखाद्या चित्रपटाला शोभेल असं भन्नाट घडलं. 'हम हैं ना!'चा सांगोलकरांमध्ये नारा घुमला अन् सांगोल्याचे कारभारी आम्हीच हे बहाद्दर सांगोलकरांनी नगपरिषदेच्या निवडणुकीतून धडाकेबाजपणे दाखवून दिलं....

सांगोल्याची राजकिय प्रकृती तशी कित्येक वर्षांपासून शेकापशी जुळली गेलेली. भाजपचं 'कमळ' हा विषय सांगोलकरांना न रुचणारा. त्यातच पालकमंत्री जयकुमार गोरेंकडून इथल्या निवडणुकित म्हणे मर्यादेबाहेर हस्तक्षेप झालेला. हेच सांगोलकरांना न पटलेलं. आपल्या छाताडावर बसून कोणतरी राज्य करायला बाहेरुन येतंय ही जनभावना झालेली. त्यातूनच सांगोलकर म्हणून स्वाभिमान उफाळून आलेला. त्याचाच परिपाक पुढे नगरपरिषदेत भाजपची गत टांगा पलटी, फरार अशी झाली.

# ठाकरे सेनेतच बिघाडी, कशी होणार आघाडी?

✔ सोलापूर/प्रतिनिधी

महापालिका निवडणुकीत पक्षातील सर्व नेत्यांनी एकत्र येऊन निवडणुका जिंकणं अपेक्षित असताना ठाकरेंच्या सेनेतील बेबनाव दिवसेंदिवस वाढत चालला आहे. सर्व नेत्यांनी आपल्यातील मतभेद बाजूला ठेवून जास्तीत जास्त नगरसेवक निवडून येण्यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित असते. मात्र, इथं दररोज एकमेकांना इशारे दिले जात आहेत. एकमेकांची उणीदुणी काढली जात आहेत, त्यामुळे गटबाजीने पोखरलेली ठाकरेंची शिवसेना बलाढ्य महायुती कसा सामना करणार, याकडे सोलापूरकरांचे लक्ष असणार आहे.

ज्येष्ठ नेते पुरुषोत्तम बरडे आणि प्रा. अजय दासरी यांच्यामधील तु...तु...मैं... मैं....तु बडा या मैं बडा...चा संघर्ष आता टोकाला गेला आहे. दोघांमधील अंतर्गत गटबाजी सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीत उफाळून आली आहे. त्याचा प्रत्यय मंगळवार (ता.२३) आला. उद्धव ठाकरे शिवसेना पक्षाच्या उमदेवारीवर सोलापूर महापालिकेची निवडणूक लढवू इच्छिणाऱ्यांच्या दोन ठिकाणी स्वतंत्ररित्या नेतेमंडळींकडून मुलाखती घेण्यात आल्या. दोन वेगवेगळ्या गटात आणि विभिन्न नेतेमंडळींच्या उपस्थितीत मुलाखती झाल्यानं बरडे आणि दासरी यांच्यातील टोकाचा संघर्ष लपून राहिला नाही. अंतर्गत मतभेद उघड झाले. तथापि इच्छुकांच्या सोईसाठी मुलाखती दोन वेगवेगळ्या ठिकाणी घेतल्याचं सांगत मुलाखती अलबेल झाल्याचा बनाव दोन्ही गटांनी केला असला तरी बरडे आणि दासरींच्या गटबाजीचा 'करिष्मा' मुलाखतींमध्ये दिसल्याचे सांगण्यात आले.

जिल्हाप्रमुख अजय दासरी यांच्याकडे सोलापूर उत्तर आणि सोलापूर शहर मध्य या विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी आहे, त्यामुळे त्यांनी या मतदारसंघातील इच्छुकांच्या मुलाखती आपल्या शहर कार्यालयात घेतल्या. त्यांच्यासोबत उपजिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, दत्तात्रेय गणेशकर उपस्थित होते. दुसरे जिल्हाप्रमुख संतोष पाटील यांच्याकडे दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी आहे, त्यामुळे पाटील, पुरुषोत्तम बरडे आणि अस्मिता गायकवाड यांनी जुळे सोलापुरात इच्छुकांना निवडणूक लढवण्याच्या अनुषंगानं, बोलतं केलं.

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून जय्यत तयारी सुरू आहे. महापालिका निवडणूक तोंडावर असतानाही पक्षातील गटबाजी संपण्याचे चिन्हं दिसत नाहीत. महापालिका निवडणूक लढविणाऱ्या इच्छुकांच्या मुलाखती मंगळवारी पक्षाकडून घेण्यात येत आहेत. मात्र, मुलाखतींच्या प्रक्रियेमध्येही गटबाजी दिसून येत आहे. ठाकरेंच्या शिवसेनेकडून दोन ठिकाणी इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या जात आहेत.

### सोलापुरी ठाकरे सेनेमधील बेकी कायम चव्हाट्यावर

अजय दासरी यांच्या वागण्यामुळे आपल्याला सोलापूर महापालिका निवडणुकीच्या मुख्य समन्वयकपदातून मुक्त करावे, अशी मागणी बरडे यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे केली होती. तसेच, दासरी यांनीही सोलापूरचे प्रभारी माजी खासदार चंद्रकांत खैरे आणि संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांच्यावर टीका केली होती. त्यांच्या कार्यपद्धतीच्या विरोधात आपण आत्मक्लेष आंदोलन करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे, त्यामुळे सोलापूर महापालिका निवडणुका लढायला निघालेल्या ठाकरे शिवसेनेतील बेकी कायम चव्हाट्यावर येत आहे.

### टोकाचा वाद, उभयतांमध्ये चिखलफेक

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात सोलापूर लोकसभेचे प्रमुख पुरुषोत्तम बरडे आणि जिल्हाप्रमुख अजय दासरी यांच्यातील वादाने गेल्या काही दिवसांपासून गंभीर रूप घेतले आहे. दोघांकडूनही जाहीररित्या एकमेकांवर चिखलफेक केली जात आहे. महाविकास आघाडीच्या बैठकीत पुरुषोत्तम बरडे यांना पाहिल्यानंतर अजय दासरी हे निघून गेले होते.

## पुण्यात ठाकरे गटाचे अस्तित्वच धोक्यात

### शशिकांत सुतार यांचे पुत्र भाजपमध्ये

✔ पुणे/प्रतिनिधी

पुण्यात एकेकाळी काँग्रेसचा दबदबा असताना १९९५ मध्ये एकाच वेळी तीन आमदार आणि २००७ मध्ये पुणे महापालिकेत २० नगरसेवक निवडून आणून ताकद दाखविणारी तत्कालीन शिवसेना दुभंगल्यावर शिवसेना ठाकरे गट हा पुण्यात एकाकी पडला आहे. शिवसेनेची दुफळी झाल्यानंतरही ठाकरे गटाचे दोन शिलेदार हे गड राखून होते. मात्र, भाजपने माजी मंत्री शशिकांत सुतार यांचे चिरंजीव, माजी नगरसेवक पृथ्वीराज सुतार आणि माजी नगरसेवक संजय भोसले या दोघांनाही भाजपमध्ये प्रवेश दिल्याने आता ठाकरे गटाकडे नगरसेवकांची संख्या शून्य झाली आहे. भाजपच्या या डावपेचात ऐन महापालिका निवडणुकीत ठाकरे गट हद्दपार झाल्यासारखी स्थिती निर्माण झाली आहे.

शिवसेना (ठाकरे) पक्षाचे गेल्या अनेक वर्षांपासून पुण्याकडे दुर्लक्ष होत आले आहे. ही बाब पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही मान्य केली. आता पुण्याकडे लक्ष देईन, असे आश्वासन त्यांनी ऑक्टोबर महिन्यात दिले होते. मात्र, त्यानंतरही संघटनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून पक्ष बळकटीसाठी फारसा प्रयत्न करण्यात आला नाही.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



शेवटी अर्ज आणलासच !


कल्याण 445-38-558

मुंबई 477-81-155


# घोडं गंगेत न्हालं; काका-पुतण्यांचं, भावांचं फिक्स झालं

## मनोमिलनाची तुतारी शुक्रवारी फुंकणार

✔ **मुंबई** : राज्यातील महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रमुख राजकीय पक्षांची दलबदलू भूमिका पाहायला मिळत आहेत. मुंबई महापालिका ठाकरेंच्या ताब्यात ठेवण्यासाठी ठाकरे बंधू एकत्र आल्याचे पाहायला मिळत आहे. त्यासाठी, बुधवारी दुपारी १२ वाजता अधिकृतपणे ठाकरे बंधूंच्या म्हणजेच मनसे-शिवसेना युतीची घोषणा होणार आहे. त्यानंतर आता पवारांच्या दोन्ही राष्ट्रवादी देखील एकत्र येणार असल्याचे निश्चित झाले आहे. मुंबईतसाठी ठाकरे तर पुण्यासाठी पवार एकत्र आल्याचे महापालिका निवडणुकांमुळे पाहायला मिळाले. ठाकरेंनंतर पुण्यात दोन राष्ट्रवादी एकत्र येणार असून २६ डिसेंबर रोजी याची घोषणा होणार असल्याची माहिती स्वत: अजित पवारांनी दिली.

अजित पवार हे २६ तारखेला दोन्ही राष्ट्रवादीच्या अधिकृत युतीची घोषणा करणार आहेत, कार्यकर्त्यांशी बोलताना अजित पवारांनी २६ तारखेला अधिकृत घोषणा करू असे सांगितले. तसेच, कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नका, २६ तारखेला सगळ्या गोष्टी समोर येतील. या संदर्भाने बुधवारी अजित पवार हे मुंबईत आढावा घेणार आहेत. दरम्यान, दोन राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चेनंतर शरद पवार गटाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी, दोन्ही



(अधिक वृत्त पान ७ वर...)

✔ मुंबई/प्रतिनिधी

मुंबई आणि पुणे,पिंपरी -चिंचवड महानगरपालिकेच्या निवडणुकीत नवी राजकीय समीकरणे उदयास येणार आहेत. मुंबईसाठी ठाकरे बंधूंचे मनोमिलन झाले असून अधिकृतरित्या शिवसेना आणि मनसे यांच्या युतीची अधिकृत घोषणा आज बुधवारी दुपारी बारा वाजता होणार आहे.त्यानंतर पुणे महापालिकेसाठी ज्येष्ठ नेते शरद पवार आणि त्यांचे पुतणे अजित पवार यांच्या दोन राष्ट्रवादी काँग्रेसची आघाडी होणार असून त्यावर शुक्रवारी दि.२६ डिसेंबरला शिक्कामोर्तब होणार आहे.अजित पवार हे राज्यात सत्तेत आहेत. त्यामुळे काकांच्या पक्षाशी आघाडी केल्यामुळे येत्या काळात सत्तेवर काय परिणाम होणार का याविषयी राजकीय जाणकार उत्सुक झाले आहेत तर ठाकरे बंधूंची एकी झाल्याने राज्यातील महाविकास आघाडीत बिघाडी होणार काय हेही पहायला मराठी माणूस उत्सुक झाला आहे.दोनही काँग्रेस आणि ठाकरे बंधू यांच्यातील एकीचे राज्यभरात काय पडसात उमटणार हे येत्या काही दिवसात कळून येईल.

## एकीची मशाल आज पेटणार



✔ **मुंबई** : साऱ्या महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या ठाकरे बंधूंच्या मुंबई महापालिकेसाठी युतीच्या घोषणेचा अखेर मुहूर्त ठरला. आज बुधवारी २४ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता पत्रकार परिषदेत ठाकरे बंधूंच्या युतीची घोषणा होईल. शिवसेना प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी ट्विटरवरुन याबाबत माहिती दिली.

मनसेप्रमुख राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाच्या नेत्यांची जागावाटपासंदर्भात बैठक झाली असून आता दोन्ही प्रमुख नेते एकत्र येणार आहेत. या दोन्ही नेत्यांकडून दुपारी ठाकरे बंधूंच्या युती आणि जागावाटपाची घोषणा केली जाऊ शकते. त्यामुळे, मुंबईसह महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकांसाठी शिवसेना-मनसे एकत्र आल्याने ठाकरेंची ताकद वाढेल,असे म्हटले जात आहे.

शिवसेना आणि मनसेची युती कार्यकर्त्यांनी युती स्वीकारली आहे. कोणाच्या मनात संभ्रम नाही. तशा सूचना कार्यकर्त्यांना देण्यात आलेल्या आहेत. एकत्र येऊन सर्व कामाला लागले आहेत. मनोमिलन झालेले असून जागावाटपवर सोमवारी रात्री शेवटचा हात फिरवला गेला, असे राऊतांनी सांगितले होते. युती झालेली आहे, केवळ जागावाटपासंदर्भातली घोषणा बाकी आहे. आमच्यात जागावाटपावरून कोणताही विसंवाद नाही. वरळीमधील डोमममध्ये

(अधिक वृत्त पान ७ वर...)